दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार ३१ मे २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २९३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# रिक्षा ३० हजाराची अनं दंड सव्वा लाखाचा ; रिक्षा चालक वैतागले

**एका रिक्षावाल्याला तर अवघ्या ३० हजाराच्या रिक्षासाठी सव्वा लाख रुपये दंड आकारण्यात आला आहे**



वाहनांना फिटनेस प्रमाणपत्र देताना विलंब झाल्यास प्रत्येक दिवसाला 50 रुपयांचे विलंब शुल्क आकारले जात आहे. जुन्या रिक्षांना हा दंड म्हणजे जिल्ह्यापेक्षा तालुका मोठा अशी स्थिती होत आहे. एका रिक्षाची सध्याची बाजारभावानुसार किंमत अवघी 30 हजार रुपये असताना तिला उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने 1 लाख 35 हजार रुपये दंड आकारला आहे. तर नूतनीकरणासाठीचा हा दंड रद्द करण्याची मागणी ऑटोरिक्षा संघटना संयुक्त महासंघाने राज्याच्या परिवहन आयुक्तांकडे केली आहे.

जुन्या वाहनाच्या नूतनीकरणासाठी विलंब केल्यास दररोज 50 रुपयांचा दंड आकारला जातो. मोठी चारचाकी वाहने आणि रिक्षासारखी छोटी वाहने यांनाही एकसारखाच दंड आकारला जात आहे. या आकारणीला मुंबई बस मालक संघटनेने उच्च न्यायालयात याचिकेद्वारे आव्हान दिले होते. पण न्यायालयाने याचिका फेटाळून लावताना परिवहन विभागाची दंडाची कारवाई योग्य ठरवली होती. त्याच्या आधारे 7 मेपासून दंड आकारणी सुरु झाली आहे. आंदोलनाचा इशारा

ऑटो रिक्षा महासंघाने परिवहन आयुक्तांना याप्रकरणी निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला आहे. बस मालकांची याचिका गेल्या महिन्यात निकाली काढण्यात आल्यानंतर लगेच परिवहन विभागाने दंड आकारणी सुरु केली आहे. यादरम्यान, 2019मध्ये केंद्रीय सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने नवी वाहतूक अधिसूचना काढली आहे. त्यामुळे सध्याचे दंडाचे परिपत्रक निरर्थक ठरले आहे. मंत्रालयाने वाहनांसाठी श्रेणीनुसार वेगवेगळे दंड निश्चित केले आहेत. त्यामुळे रिक्षांना दररोज 50 रुपये दंड आकारु नये, अन्यथा राज्यातील प्रत्येक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयासमोर आंदोलने केली जातील, असा इशारा ऑटो रिक्षा महासंघाचे अध्यक्ष महेश चौगले यांनी परिवहन आयुक्तांना दिला आहे.

## के.एस.पी. विद्यालयाच्या १० वीच्या विद्यार्थ्यांचा १००%



**केज प्रतिनिधी**

बीड (प्रतिनिधी)- बीड शहरातील के.एस.पी विद्यालयाने दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम ठेवली असून शाळेचा एकूण निकाल 100 टक्के लागलेला असून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव ऋषिकेश शेळके व शाळेच्या संस्थाध्यक्ष अंजली शेळके यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

बीड शहरातील कालिका नगर येथील के.एस. पी. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळविले असून यामध्ये 1) रानमारे शिवानी 96..60% 2) गोरे संस्कार 95.40 3)भोंडवे शुभांगी95.20%, 90 %पेक्षा जास्त 18 विद्यार्थी यांनी यांनी मार्क प्राप्त केलेले आहेत.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे सचिव श्री.ऋषिकेशजी शेळके आणि संस्थाध्यक्षा अंजलिताई शेळके यांनी सत्कार करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## अहिल्या देवी होळकर पुतळा परिसरातील दुरुस्तीच्या कामाला सुरुवात मिनाक्षी देवकते यांच्या प्रयत्नाला यश

**बीड प्रतिनिधी**

)- बीड शहरातील अहिल्या देवी होळकर यांचा पुतळा परिसरात स्वच्छतेचे तसेच फरशांच्या दुरुस्तीचे काम तसेच सुशोभीकरण बाणाई महिला सेवाभावी संस्थेच्या वतीने मिनाक्षी देवकते डोमाळे यांनी नगर परिषद मुख्याधिकारी यांच्याशी वेळोवेळी लेखी पत्र व्यवहार तसेच पाठपुरावा करुन उद्या होणाऱ्या अहिल्यादेवी होळकर जयंतीसाठी सुशोभीकरण करुन घेतले आहे. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी अहिल्यादेवी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यासाठी



बाणाई सेवाभावी संस्था व अहिल्या महिला आघाडीच्या वतीने अहिल्यादेवी होळकर जयंतीची तयारी बाणाई महिला सेवाभावी संस्थेच्या वतीने करण्यात आली असल्याचे संस्थेच्या मिनाक्षी देवकते डोमाळे यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे. तसेच दि.31 मे 2024 रोजी होणारे रक्तदान शिबिरास प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ.उषाताई दराडे, सुशिलाताई मोराळे यांची उपस्थिती राहणार असून जयंतीनिमित्त लोकोपयोगी कार्यक्रम घेणार असल्याचे पत्रकाद्वारे सांगितले आहे. कार्यक्रमाच्या वेळी समाजातील सर्व घटकांना आमंत्रित केले असून तृतीयपंथी असणाऱ्या बीड येथील सपनाताई बाळू धुताडमल यांचा सत्कार देखील यावेळी होणार आहे तसेच जयंतीनिमित्त महिलांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमाला व रक्तदान शिबिराला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मिनाक्षी देवकते डोमाळे,(मो.9075558807) शेखराणीताई(7385328420) पुनम कांबळे,अरुणा आठवले, अलका डोंगरे, रेहाना पठाण, यांनी केले आहे.

## निवृत्तीवेतनधारक व कुटुंबनिवृत्तीवेतन धारकांना ऑनलाइन धोकेबाजीपासून सावधतेचे आवाहन

**बीड प्रतिनिधी**

बीड, दि. 30: बीड जिल्हा कोषागाराचे अधिनस्त सर्व निवृत्तीवेतनधारक व कुटुंबनिवृत्तीवेतनधारक यांना ऑनलाइन धोकेबाजी पासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात येते की, कोषागारामार्फत निवृत्तीवेतनधारक यांना निवृत्तीवेतन / सुधारित निवृत्तीवेतन / कुटुंबनिवृत्तीवेतन तसेच निवृत्तीवेतन विषयक इतर लाभ प्रदान करण्यात येतात.

सदर लाभ प्रदान करताना कोणत्याही प्रकारे वसुलीबाबत किंवा प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेबाबत कोषागार कार्यालयामार्फत फोन करुन संपर्क साधला जात नाही किंवा ऑनलाईन व्यवहार करण्याविषयी सुचित केले जात नाही. कोषागार कार्यालयामार्फत फक्त लेखी स्वरुपात पत्रव्यवहार केला जातो. याबाबत काही निवृत्तीवेतनधारकांना फोन करुन ऑनलाईन रक्कम भरल्यानंतर कोषागारातील थकीत रक्कम मिळणार असल्याचे सांगितले जाते आहे. याबाबतच्या तक्रारी कोषागार कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. अशा कोणत्याही प्रकारचा फोन जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत केला जात नाही किंवा कोषागार कार्यालयातील कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतनधारकांच्या घरी पाठविले जात नाही. सर्व निवृत्तीवेतनधारक व कार्यरत कर्मचारी यांना आवाहन करण्यात येते की, आपणास दुरध्वनी / भ्रमणध्वनीवरुन उपरोक्त प्रदानासंदर्भात संपर्क साधुन रक्कम ऑनलाईन, गुगल पे, फोन पे किंवा इतर इलेक्ट्रानिक माध्यमाव्दारे भरणेबाबत जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत कळविले जात नाही. तरी कोणीही अशा दुरध्वनी संदेशावर प्रतिसाद देऊ नये. याबाबत निवृत्तीवेतनधारकांनी परस्पर रक्कम भरल्यास ती निवृत्तीवेतनधारकाची वैयक्तिक जबाबदारी राहील, याची नोंद घ्यावी. तसेच अशा प्रकारच्या दुरध्वनी प्राप्त झाल्यास कृपया कोषागार कार्यालयास अवगत करावे. तसेच कोणतेही व्यवहार करण्यापुर्वी अथवा शंका असल्यास प्रथमतः कोषागार कार्यालयाशी संपर्क साधण्यात यावा. असे आवाहन बीड जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत जिल्हा कोषागार अधिकारी श्री. महेश वि. बाब्रस व अप्पर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन) श्री. राजेंद्र जोरे यांचे कडुन करण्यात येत आहे.

## चंपावती शाळेची माधवी देशमुख 95 टक्के गुण घेऊन घवघवीत यश



बीड (प्रतिनिधी)-येथील चंपावती शाळेची विद्यार्थीनी माधवी मनोज देशमुख या विद्यार्थीनीने दहावीच्या परीक्षेमध्ये 95.60 टक्के मार्क घेऊन शाळेचे नाव उज्वल केले आहे. तिला सर्वच विषयामध्ये 90 च्या पुढे मार्क मिळाल्याने तिचे शाळेच्या मुख्याध्यापिका एन.डी. कुलकर्णी, उपमुख्याध्यापक संजय चौसाळकर, गाडे सर, धावडे सर, गायकवाड सर, राऊत सर, परळीकर सर, गोसावी सर, महाजन सर, खिस्ते सर, जोशी मॅडम आदिंनी अभिनंदन केले आहे. तिच्या या यशामुळे माधवीचे सर्वत्र कौतूक होत आहे.

## शेतक-यांनी कापूस बियाण्यांच्या ठराविक वाणांचा आग्रह धरु नये

**बीड प्रतिनिधी**

बीड, दि. 30 :- महाराष्ट्र राज्यात कापूस पीक क्षेत्र 40.20 लाख हेक्टर आहे. कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार प्रति हेक्टर 4.2 पाकिटे बियाण्याची आवश्यकता असते. या क्षेत्राकरीता 1 कोटी 70 लाख पाकीटाची आवश्यकता आहे. सर्व कंपन्यांचा आढावा घेतला असता साधारणे 1.75 कोटी पाकीटे उपलब्ध आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात कापूस बियाण्याची कमतरता नाही. अमरावती व अकोला या जिल्ह्यात कापूस एक प्रमुख पीक आहे.तरी शेतक-यांनी कापूस बियाण्यांचा ठराविक वाणाचा आग्रह धरु नये असे आवाहन, पुण्याचे कृषि आयुक्तालयाचे संचालक विकास पाटील यांनी केले आहे.

अमरावतीमध्ये 2.12 लाख हेक्टर व अकोलामध्ये 1.46 लाख हेक्टर कापूस पीक क्षेत्र आहे. अमरावती जिल्ह्यात खरीप-2024 साठी 12 लाख व अकोला जिल्ह्यासाठी 9 लाख कापूस पॅकेट पुरवठयाचे नियोजन कृषी विभागाने केले आहे. आज अखेर अमरावतीमध्ये 6.75 लाख व अकोल्यात 6.15 लाख कापूस पॅकेट पुरवठा करण्यात आला आहे. व इतर इतर कापूस बियाण्याचा पुरवठा प्रगतीपथावर आहे. अजित-155 या वाणास दोन जिल्हयामध्ये शेतकऱ्यांची जास्त पसंती असते. परंतु सदरील वाणाची उपलब्धता या दोन जिल्ह्याकरीता मर्यादित असल्यामुळे सर्व शेतकऱ्यांना हा वाण मिळू शकत नाही. परंतु त्याच्या दर्जाचे इतर कंपनीच्या वाणांची उपलब्धता आहे. त्यामुळे शेतक-यांनी कापूस पीकाच्या ठराविक वाणाची मागणी करू नये याबाबत आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आलेले आहे. अजित सीड्स या कंपनीने कृषी विभागास दिलेल्या नियोजनानुसार अमरावतीमध्ये 79180 कापूस पॅकेट (नियोजन) पैकी 79180 कापूस पॅकेट पुरवठा केला आहे व अकोल्यामध्ये 152000 कापूस पॅकेट (नियोजन) पैकी 152000 कापूस पॅकेट पुरवठा केला आहे.

केंद्र सरकारने खरीप 2024 साठी कापूस BG II चा दर 864 रुपये निश्चित केला आहे. कापूस बियाणे जादा दराने विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्र तसेच कापूस उत्पादक कंपनी यांचेवर कारवाई करण्याचे निर्देश संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) यांच्या मार्फत आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच काही ठिकाणी कापूस जादा दराने विक्री केली असल्याचे निदर्शनास आल्यानंतर कृषी विभागातील स्थानिक कृषी सहाय्यक यांच्या मदतीने संबंधित कापूस बियाण्याचे वाटप कृषी विभागाच्या कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्याचे नियोजन संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

कविता

## भेट अश्रूंची

घेऊ नकोस पुन्हा शोध त्या
डोहातल्या चांदण्यांचा .
नको खेळू तोच खेळ
तुटलेल्या चांदण्याचा

मन तुझ्या सोबतीलाच होतं
पण विचारायचंच राहून गेलं
प्रेम होतं की मैत्री
भेट अश्रूंचीच देऊन गेलं

तूझ्या माझ्या नात्याचा
अर्थ मला कळला नाही
दोघांमधला तो क्षण
टाळून देखील टळला नाही

तू दिलेलं मोरपीस
स्वप्नामध्ये येऊन गेलं
प्रेम होत की मैत्री
भेट अश्रूंची च देऊन गेलं

तूझ्या माझ्या भेटीचे
क्षण मी जपले होते
तुझे सारे स्पर्श
पापणी खाली लपले होते

ते अनामिक नात आपल
खूप काही देऊन गेलं
प्रेम होत की मैत्री
भेट अश्रूंची च ठेऊन गेलं

सिमा शिंपी
८९७५७५७६७१
पुणे..

# बार,दारु दुकानांची संयुक्त तपासणी करा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

अल्पवयीन मुलांचे मद्यप्राशन तसेच मद्य पिऊन वाहन चालविणे व त्यातून होणारे अपघात रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाद्वारे कडक उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी संयुक्त पथके स्थापन करुन परमिट रुम, बियरबार, मद्यविक्री दुकाने, वाहने इ.ची तपासणी करावी, यासोबतच पालक व मुलांचे प्रबोधन करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

अल्पवयीन मुलांमध्ये मद्यप्राशन व अन्य व्यसनाधिनता त्यातून होणारे गुन्हे, अपघात इ. प्रकार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तात्काळ उपाययोजना राबविण्याबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात संयुक्त बैठक पार पडली. पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, जिल्हा परिषदेचे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुनिल भोकरे, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क संतोष झगडे, पोलीस उपायुक्त वाहतुक शिलवंत नांदेडकर, पोलीस उपायुक्त एस.एन. भुजंग, सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी एम.व्ही. दौंड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दयानंद मोतीपवळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर आदी उपस्थित होते. जिल्ह्यात ३६ मध्य विक्री दुकाने, ८२२ परमिट रुम बियर बार, १०६ बियर शॉपी, १४२ देशी दारु दुकाने आहेत. मद्य विक्री दुकानांना सकाळी १० ते रात्री साडेदहा वा. पर्यंत, परमिट रुम बियरबार सकाळी १० ते रात्री साडेदहा वा. पर्यंत सुरु ठेवण्याची मुभा आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे देण्यात आली. सर्व मद्यविक्री दुकानांवर अल्पवयीन (२१ वर्षेपेक्षा कमी वय) मुलांना मद्य विक्री न करणे, परमिटरुम-बियरबार मध्ये अल्पवयीन मुलांना प्रवेश न देण्याबाबत सर्व बारचालक व मद्यविक्रेत्यांना सक्त अंमलबजावणीच्या सुचना देणे. याबाबत बार व मद्य विक्री दुकानांच्या अचानक तपासण्या करण्यात याव्या. त्यासाठी राज्य उत्पादन शुल्क, पोलीस विभाग, महानगरपालिका, परिवहन विभाग, आरोग्य विभाग व अन्य संबंधित विभागांचे संयुक्त पथक तयार करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. छुप्या मद्यविक्री व मद्यसेवनावरही लक्ष ठेवून कारवाई करा, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. मद्य विक्री दुकानाच्या आजूबाजूला आडोसा शोधून तेथेच मद्यप्राशन करणारे, परवानगी नसतांना जेवणाच्या हॉटेलात मद्यपान करु दिले जाते अशा ठिकाणी कारवाई करावी. मद्य पिऊन वाहन चालविणाऱ्यांची 'ब्रेथ ॲनॅलायझर' यंत्राद्वारे तपासणी करण्यात यावी, असेही निर्देश देण्यात आले. अल्पवयीन मुलांना वाहने चालविण्यास देऊ नयेत. मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील १९२ अ-१९२-१ तसेच कलम १९९ अ मधील तरतूदीनुसार गुन्हे दाखल करण्यात यावे. त्यांच्या पालकांवर गुन्हे दाखल होणे, वाहनाची नोंदणी रद्द करणे तसेच दंडाची तरतूद ही आहे. याबाबत पालक व पाल्य यांच्यामध्ये जनजागृती करण्यात यावी. त्यासाठी महाविद्यालये, विद्यालयांच्या स्तरावर कार्यक्रम घेऊन प्रबोधन करण्यात यावे,असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

## नाशिक मध्ये वडाळा गावातील एका घरावर छापा टाकून २० किलो गांजा जप्त गुन्हे शाखा युनिट एकची कारवाई



वडाळा गावातून नाशिक मध्ये गांजाची छुप्या पद्धतीने विक्री केली जात असल्याची गुप्त माहिती युनिट १चे हवालदार मुक्तार शेख यांना मिळाली होती शाहरुख शहा रफिक शहा( वय २९ रा. ए - आठ महाडा वसाहत बिल्डिंग, वडाळा गाव मूळ रा. मेहबूबनगर ,नाशिक असे गांजाचा साठा करून विक्री करणाऱ्या संशयताचे नाव आहे. त्यानुसार पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, गुन्हे शाखेचे उपायुक्त प्रशांत बच्छाव, सहायक आयुक्त डॉ. सिताराम कोल्हे व युनीट एकचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड यांच्या निर्देशानुसार पथकाने काल सायंकाळी पाच वाजता शहा यांच्या घरावर छापा मारून त्याच्याकडून ४.१५ लाख रुपयाचा ओलसर गांजा व एक मोबाईल असा चार लाख ३१ हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून शहा याला ताब्यात घेण्यात आले आहे. त्यानंतर त्याच्याकडे अधिक चौकशी सुरू असून इंदिरानगर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पुढील तपास उपनिरीक्षक बि.डी. सोनार करत आहेत.

## सोयगावच्या गोदामपाल व पुरवठा अधिका-्यावर गुन्हा दाखल करा-बहुजन समाज पार्टी



वादळवार्ता/सोयगाव
जरंडी च्या रेशन धान्य दुकानात झालेल्या महसूल च्या पंचनाम्यात उघड झालेल्या गैर प्रकरणी संबंधित गोदामपाल व पुरवठा अधिकारी यांच्या विरुद्ध जीवनावश्यक वस्तू अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचा मागणीचे निवेदन गुरुवारी दुपारी तीन वाजता सोयगाव तहसीलदार मनीषा मेने यांच्याकडे बहुजन समाज पार्टी च्या वतीने देण्यात आले अध्यक्ष संघपाल सोनवणे यांचा नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी निवेदन दिले असून जरंडी च्या रेशन दुकानात पुरवठा झालेल्या धान्याच्या गोणीत प्रत्येकी तीन ते चार किलो गहू व तांदूळ कमी भरल्याचा प्रकार महसूल च्या पंचनाम्यात उघड झाले संबंधित गोदाम पाल व पुरवठा अधिकारी हे संगनमताने हा प्रकार करत असल्याचे या निवेदनात नमूद आहे तालुक्यातील सर्वच रेशन दुकानात हा प्रकार सर्रास सुरू आहे याची महसूल प्रशासनाने खात्री करून चौकशी करावी असे निवेदनात नमूद आहे दरम्यान गोरगरीब जनतेच्या घशातून धान्याची चोरी करणाऱ्या या दोन्ही अधिकार्यावर गुन्हा दाखल व्हावा यासाठी सोयगाव तहसील कार्यालय समोर आंदोलन छेडणार असल्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे..

जरंडीच्या रेशन दुकानात पुरवठा झालेल्या धान्यात गहू व तांदूळ गोणीतून काढून प्रत्येकी तीन ते चार किलो धान्य कमी प्राप्त झाले आहे महसूल विभागाने केलेल्या पंचनाम्यात जरंडी दुकानात तब्बल सहा क्विंटल २१ किलो धान्य गायब झाले आहे हे धान्य गेले कुठे असाही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे मंडळ अधिकारी मारोती धोंडकर यांनी मंगळवारी केलेल्या धान्य दुकानाच्या पंचनाम्याचा अहवाल तहसील ने जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे गुरुवारी सादर केला आहे परंतु या दोन्ही दोषी अधिकाऱ्यावर जीवनावश्यक वस्तू अंतर्गत गुन्हा दाखल करावा यासाठी बसपा चे संघपाल सोनवणे गुरुवारी सोयगाव तहसील कार्यालयात दोन तास ठाण मांडून होते तहसीलदार मनीषा मेने यांनी चौकशी करून कारवाई करण्याची आश्वासन दिल्या वर अखेर बैठे उपोषण माघार घेऊन बसपा चे वतीने आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे

## कोणतेही कोचिंग क्लासेस न लावता प्रियांशी म्हात्रे हिचे दहावी परीक्षेत घवघवीत यश.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शाळांत परीक्षेचा निकाल सोमवार दि. २७ में २०२४ रोजी ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत उरण येथील जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल ने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल १००% लागला आहे. या परीक्षेत प्रियांशी पंकज म्हात्रे हिने ८४.४०% गुण संपादन करून तिसरा क्रमांक प्राप्त केला. यशाच्या रहस्या बद्दल प्रियांशी हिला विचारले असता, तिने सांगितले की दहावीच्या परीक्षेसाठी कोणताही कोचिंग क्लासला न जाता स्वतः अभ्यास केला तसेच स्वयम अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे मार्गदर्शन तसेच मैत्रिणीचे सहकार्य मला मिळाले. जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल आवरे शाळेचे दहावीला शिकवणाऱ्या शिक्षकांनी उत्तम मार्गदर्शन केले. तसेच शाळेत असणारी शिस्त, जादा तास व जास्तीत जास्त असणाऱ्या सराव परीक्षा याचा मला फायदा झाला. संस्थेचे अध्यक्ष अशोक ठाकूर तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका निकिता म्हात्रे यांनी माझे शालेय प्रश्न समजून घेतले, व सोडवण्याचा प्रयत्न केला त्यामुळे दहावीला मला चांगले यश मिळाले. भविष्यात आय, आय, टी. इंजिनिअर होण्याचे स्वप्न आहे.या यशाबद्दल पंचक्रोशीतील प्रियांशी चे कौतुक करण्यात येत आहे. प्रियांशीचे वडील एस टी महामंडळ उरण येथे कंडक्टरचे काम करतात व आई ग्रामपंचायत गोवठणेच्या सदस्या आहेत. प्रियांशीचा आदर्श बाकीच्या विद्यार्थ्यांनी घ्यावा असे मत शिक्षक, कर्मचारी,ग्रामस्थांनी बोलून दाखविले.



# श्री गजानन माध्यमिक विद्या मंदिर व बसवंतराव पाटील इंग्लिश हायस्कूलचा याही वर्षी निकाल १००% गुणवंत विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार

**उरण प्रतिनिधी**

श्री गजानन माध्यमिक विद्या मंदिर रांजणगाव तसेच बसवंतराव पाटील माध्यमिक इंग्लिश हायस्कूल चा दहावी चा निकाल दरवर्षी प्रमाणे १००%निकाल लागला आहे,यात प्रथम क्रमांक निशा डंबरे ९५.४०% (,गणित विषयात ९७/१००,ई भू ना विषयात ९७/१००द्वितीय क्रमांक,चांदणे ऋषिकेश ९४.६०%( गणित विषयात ९७/१००, ई भू ना,विषयात ९८/१००) द्वितीय क्रमांक,नांनवटे सौरभ ९४.६०% (गणित विषयात ९६/१००, ई भू ना शास्त्र,विषयात १००/१००) तृतीय क्रमांक पाटील कृष्णा ९४.००%(हिंदी विषयात ९६/१०० ई भू ना विषयात ९७/१००)तसेच बसवंतराव पाटील माध्यमिक इंग्लिश हायस्कूल चे गुणवंत विध्यार्थी प्रथम क्रमांक निकस सुमित ९१.६०% (विज्ञान विषयात ९८/१००)द्वितीय क्रमांक पाईकराव पियुष ९१.००%( गणित विषयात ९८/१००) तृतीय क्रमांक सनासे भाग्यश्री ९०.६०% सत्कार प्रसंगी,गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष आय जी जाधव, प्रमुख पाहुणे इफका कंपनीचे संचालक महाराष्ट्र भूषण श्री वेंकटेश मैलापुरे साहेब, एम्स क्लासेसचे संचालक डॉक्टर दिनेश पाटील, मस्के साहेब, सचिव हरीश जाधव, गजानन प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका श्रीमती सुरेखा बस्वदे, मुख्याध्यापक एम व्ही शिनगारे, मुख्याध्यापक बी व्हीं शिरसाट,रेखा बिदरकर, विभाग प्रमुख प्रा संजय तुपे,पूजा गिरी, क्रीडा शिक्षक जब्बार पठाण,नरवाडे मॅडम,संभाजी जाधव,विनय औसरमल,प्रल्हाद मंगनाळे, आदी मान्यवर पालक वृंद आणि गुणवंत विद्यार्थी उपस्तीत होते

# कु श्रध्दा बालाजी जोरगुलवार ८८% घेऊन घवघवीत यश

**नायगाव प्रतिनिधी**



नायगाव येथील ब्लू बेल्स इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी कु श्रध्दा बालाजी जोरगुलवार हिने दहावी २०२४ शालांत परीक्षेमध्ये ८८% गुण प्राप्त करून घवघवीत संपादन केले आहे श्रद्धा बालाजी जोरगुलवार सर्वच विषयात ८८ च्या पुढे गुण प्राप्त करून यश संपादन केले व शाळेचे नाव रोशन केले त्यांच्या घवघवीत यशाबद्दल माजी आमदार वसंतराव पाटील चव्हाण, विजय पाटील चव्हाण,के हरिबाबू सर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ सितालक्ष्मी मॅम, शाळेच्या सल्लागार डॉ साईदिप्ती मॅडम यासह स्कूल मधील शिक्षक वृंद आदीने कौतुक अभिनंदन केले.

# मतमोजणी प्रक्रियेत सूक्ष्म निरीक्षकांची महत्त्वाची भूमिका: जिल्हा निवडणूक अधिकारी

बीड, दि.30: मतमोजणी प्रक्रियेत सूक्ष्म निरीक्षकांची महत्त्वाची भूमिका असून सूक्ष्म मतमोजणी प्रक्रियेत सूक्ष्म निरीक्षकांची महत्त्वाची भूमिका असून हे निरीक्षक निवडणूक निरीक्षकांचे प्रतिनिधी म्हणून काम करतात त्यामुळे सूक्ष्म निरीक्षकांनी अधिक सजग राहून मतमोजणीच्या प्रक्रियेत सहभाग नोंदवण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी आज केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आज सूक्ष्म निरीक्षकांची मतमोजणीचे प्रशिक्षण घेण्यात आले त्यावेळी त्या बोलत होत्या. अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे हे यावेळी उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी अरविंद लाटकर यांनी सूक्ष्म निरीक्षकांचे प्रशिक्षण घेतले. सूक्ष्म निरीक्षक हे निवडणूक निरीक्षकांचे प्रतिनिधी म्हणून निवडणूक प्रक्रियेचा भाग असतात मतमोजणीच्या प्रक्रियेतही सूक्ष्म निरीक्षकांची भूमिका महत्त्वाची असते. मतमोजणी कक्षात एक सुपरवायझर एक सहाय्यक आणि सूक्ष्म निरीक्षक असे तीन लोक असतात. मतमोजणीच्या वेळी प्रत्येक उमेदवाराला मिळालेले मत हे इंग्रजी भाषेत लिहायचे असून ते नीट लिहिले की नाही याची उलट तपासणी सूक्ष्म निरीक्षक हे करत असतात. सूक्ष्म निरीक्षक हे केंद्र




शासनाच्या विविध विभागातले अधिकारी कर्मचारी आहेत. सूक्ष्म निधीक्षक हे थेट निवडणूक निरीक्षकांना रिपोर्टिंग करतील. प्रत्येक फेरीत 14 मतदान केंद्रांचे मतमोजणी केली जाणार असून कुठल्याही दोन मतदाना केंद्रांची सी यु हे सूक्ष्म निरीक्षकांच्या माध्यमातून निवडणूक निरीक्षक त्याची उलट तपासणी करतील. यासह एक फेरी संपल्यावर या फेरीतील कुठल्याही पाच मतदान केंद्रांच्या सीईयूंची पुन्हा तपासणी सूक्ष्म निरीक्षकांच्या माध्यमातून निवडणूक निरीक्षक करतील त्यामुळे सूक्ष्म निरीक्षकांचे काम अतिशय महत्त्वाचे असल्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी यावेळी सांगितले.

भारतीय निवडणूक आयोगाच्या वेबसाईट सॉफ्टवेअर एन्कोर या सॉफ्टवेअर मध्ये अद्यावत करण्याचे कामही सूक्ष्मनिरीक्षकांचे असणार आहे हे अपडेशन झाल्यानंतर निवडणूक आयोग आकडेवारी घोषित करेल. मतमोजणी प्रक्रियेत पारदर्शकता असावी यासाठी भारत निवडणूक आयोगाने अजिमुल हक व बस्सवराज आर. सोमन्ना या सनदी सेवेतील दोन वरिष्ठ अधिकारी यांची मतमोजणी निरीक्षक म्हणून नियुक्ती केलेली आहे. या दोन्ही निवडणूक निरीक्षकांच्या आदेशांचे पालन सूक्ष्म निरीक्षक यांना करावे लागणार आहे.

## संभाजी ब्रिगेड राज्य कार्यकारणी बैठक पुणे



# कै. विश्वनाथराव नळगे माध्यमिक विद्यालयाचा ९८ टक्के निकाल

**लोहा प्रतिनिधी**

राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी शालांत परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला. लोहा शहरातील कै. विश्वनाथराव नळगे माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९७.७० टक्के लागला तर सेमी माध्यमाचा निकाल १०० टक्के लागला. त्यामध्ये विशेष प्राविण्य मिळवणारे एकूण १४४, प्रथम श्रेणीत ७७ तर द्वितीय श्रेणीत ३३ विद्यार्थी उतिर्णा झाले. ९५ टक्क्या पेक्षा अधिक गुण मिळविणारे विद्यार्थी पुढील प्रमाणे - वरद गंगाधर जाधव ९७.४०, साईराज पंढरी गवते ९७.४०, कु. सय्यद अफसान अकबर ९७, कु. वैष्णवी गोपाळराव पवार ९७, कु. मयुरी मारुती व्हटकर ९६.८०, कु. वैष्णवी भिवजी वाघमारे ९६.८०, कु. प्रीती नागोराव केंद्रे ९६.४०, कु. वैष्णवी गणेशराव कुबडे ९६.४०, कु. श्रावणी संजयराव जंगले ९६.२०, कु. भाग्यश्री संबोड ९५.८०, कु. श्रावणी विकास गाडेकर ९५.२०, कु. सानिया मैनू सय्यद ९५.४० असे आहेत.

दहावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष केरबा सावकार बिडवई, उपाध्यक्ष शंकर सावकार उत्तरवार, सचिव अशोकराव चालीकवार, संचालिका इंदुमती बिडवई, श्रीमती रत्नमाला बिडवई, संचालक सखाहारी वट्टमवार, नारायण चुडावकर, दिलीप तेललवार, लक्ष्मीकांत बिडवई, शशिकांत बिडवई, मुख्याध्यापक विलास नागेश्वर, पर्यवेक्षक गणेश माळवदकर, प्राथमिकचे मुख्याध्यापक बालाजी तांबुळे सह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

# वृंदावनी कृष्ण भक्ताच्या मयूर नृत्याने आचंबीत केल श्रीमदभागवत कथेत बालगोपाळ देखील कृष्णाचे सवंगडे बनुन सहभागी

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

धाकटी अलंकापुरी सिध्देश्वर संस्थानवर महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांच्या रसाळ वाणीतून सुरू असलेल्या भागवत कथेत वृंदावनी कृष्ण भक्ताच्या मयूर नृत्याने आचंबीत केले या कथेत बालगोपाल मनमुराद आनंद घेतात आणि महिला पुरुष भाविक देखील तालावर भक्तिप्रेमात धूंद होऊन ठेका धरतात . गेली सहा दिवसापासून समस्त महिला हरिपाठ मंडळाच्या पुढाकारातून सिध्देश्वर संस्थानवर भागवत कथेचे आयोजन गेली तीन वर्षापासुन केले जात आहे ,याहीवर्षी मंगळवारपासून कथा सुरू असुन वेगवेगळ्या प्रसंगानूसार वृंदावन निवासी अजयभैय्या हे कथेतील पात्र साकार करून भाविकांना गोकुळ वृंदावनात असल्याची अनुभूती देत आहे ,स्वत: शास्त्रीय नृत्य पारंगत असल्याने भरत नाट्यम् , कथ्थक नृत्याचे सादरीकरण करतात ,रविवारी तर मयूर



नृत्य सादर करून सर्वांनाच आचंबीत केले ,सोमवारी भगवान शंकराचे तांडव नृत्य सादर करणार असुन कथेचा समारोप मंगळवारी सकाळी विवेकानंद शास्त्री यांचे काल्याचे किर्तन आणि अशोक गायकवाड यांच्या महाप्रसादाने होणार आहे .कथेला संगिताचा साज आणि बाज मिळाल्याने कथेचा आनंद द्विगुणीत झाला होता .

# आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत नेहा सिरसट व भाग्यश्री सिरसट ला सुवर्णपदक.

**प्रतिनिधि/किल्लेधारूर**

नेपाळ मध्ये झालेल्या १५ वी नेपाळ शोतोकन कराटे असोशिएशन च्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत धारूर येथील नेहा शामराव सिरसट व भाग्यश्री संतोष सिरसट यांनी वेगवेगळया गटात सुवर्ण पदक मिळवले असून या बहीणीचे या यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे. धारूर येथील कराटे खेळाडु असणा-या नेहा शामराव सिरसट व भाग्यश्री संतोषराव सिरसट या नेपाळ मध्ये झालेल्या १५



वी नेपाळ शोतोकन कराटे असोसिएशन च्या आंतरराष्ट्रीय



कराटे स्पर्धेत खेळण्या साठी गेले होत्या ५० वर्ष वजन गटात नेहा शामराव सिरसट हिने उत्कृष्ट प्रदर्शन करत सुवर्ण पदक मिळवले. तर खुल्या गटात भाग्यश्री संतोषराव सिरसट हिने उत्कृष्ट प्रदर्शन करत सुवर्ण पदक मिळवले व आंतरराष्ट्रीय पातळीवर कराटे स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले.या दोन्ही नवोदीत कराटे खेळाडूनी आंतरराष्ट्रीय पातळीवर सुवर्ण पदक मिळवलेया दोन्ही खेळाडूचे यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे. या कराटे खेळाडूना प्रशिक्षक राम नेमाटे यांनी मार्गदर्शन केले.




जिवाची वाडी येथे काशिमबुवा यात्रानिमीती जंगी कुस्त्याचा फडात सामना करताना पै. भगवान सुदाम चौरे,जिवाची वाडी कर-पै.हनुमंत पांढरे,कासारी(बो.) कुस्ती लावताना वस्ताद आण्णा गोवर्धन चौरे इ.

# गणवेशासाठी कापडाची खरेदी न झाल्याने विद्यार्थ्यांना गणवेश उशिरा मिळणार शाळेच्या-पहिल्याच दिवशी विद्यार्थी गणवेश विना

यंदाच्या शैक्षणिक वर्षात जिल्हा परिषदेच्या शाळांच्या मोफत गणवेश योजनेसाठी लागणारा कपड्यांची अद्यापही खरेदी न झाल्याने शाळेच्या पहिल्या च दिवशी सोयगाव तालुक्यातील १३ हजार ५८४ विद्यार्थी गणवेशाविना हजर होतील अशी स्थिती सोयगाव तालुक्यात आहे दरम्यान यंदा सर्वच विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ मिळणार आहे परंतु त्यासाठी जिल्हा परिषद स्तरावर गणवेश साठी कपडा खरेदी करण्यात येणार होता परंतु शासनाने अद्यापही कापड खरेदीसाठी निधी उपलब्ध करून दिलेला नाही त्यामुळे शाळेच्या पहिल्या च दिवशी सोयगाव तालुक्यातील विद्यार्थी गणवेशाविना राहणार आहे

गणवेश योजनेत जिल्हा परिषद कापड खरेदी करून त्या कापडाची कटाई करून जिल्ह्यातील नोंदणीकृत महिला बचत गटांना गणवेश शिलाई साठी देण्यात येणार आहे त्यासाठी जिल्ह्यातील नोंदणी कृत महिला बचत गटांच्या महिलांना मार्च ते एप्रिल या काळात मोफत शिलाई प्रशिक्षण ही देण्यात आले आहे सोयगाव तालुक्यातील ३५ बचत गटांच्या १६० महिलांनी हे प्रशिक्षण घेतले परंतु अद्यापही गणवेश साठी कापड खरेदी न झाल्याने महिला बचत गटांना गणवेश शिलाईसाठी काम देण्यात आलेले नाही सोयगाव तालुक्यात यंदा पहिली ते आठवी साठी गणवेश योजनेत १३ हजार ५८४ विद्यार्थी पात्र आहे परंतु कापड साठीच निधी उपलब्ध झालेला नाही त्यामुळे यंदाही मोफत गणवेश योजना बारगळली आहे

सोयगाव तालुक्यातील नोंदणी कृत बचत गटांपैकी ३५ बचत गटातील १६० महिलांना गणवेश शिलाईसाठी प्रशिक्षण देण्यात आले आहे सोयगाव तालुक्यातील महिला बचत गट गणवेश शिलाईसाठी सज्ज झालेल्या आहे

**तुषार बरगट**
**तालुका अभियान**
**व्यवस्थापन अधिकारी**
**सोयगाव पंचायत समिती.....**

जिल्हा परिषदेच्या वतीने मोफत गणवेश साठीची पात्र विद्यार्थ्यांची माहिती पाठविण्यात आले आहे परंतु अद्याप कोणतेही मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या नाही

**रंगनाथ आढाव**
**गटशिक्षणाधिकारी**
**सोयगाव**

## राज्यस्तर क्रिकेट पंच परीक्षेमध्ये ओशियन क्रिकेट ॲकॅडमी पाटोदा व जामखेड येथील मुले चमकली प्रशिक्षक सुशील तांबे यांच्या विद्यार्थ्यांची कामगिरी



पाटोदा प्रतिनिधी :- दिनांक 30 राज्यस्तर टेनिस क्रिकेट असोसिएशन तर्फे घेण्यात येणाऱ्या पंच परीक्षेमध्ये पाटोदा व जामखेड येथे सुरू असलेल्या ओशियन क्रिकेट ॲकॅडमी च्या मुलांनी घवघवीत यश संपादन केले. या पंच परीक्षेसाठी टेनिस क्रिकेट असोसिएशन इंडिया च्या सचिव मीनाक्षी गिरी मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. या परीक्षेसाठी तब्बल नऊ जणांनी ओशियन क्रिकेट ॲकॅडमी मधून भाग घेतला यापैकी दहाची दहा मुले यशस्वी झाली. यामध्ये देवांश बांगर ,पृथ्वी भोंडवे ,अंश कांकरीया, संकेत बांगर, आदित्य जायभाय, समर्थ देशमुख, विनय घाडगे ,साईराज जाधव यांनी यश मिळावले. अकॅडमीचे तांबे सर यांनी विशेष तयारी मुलांकडून करून घेतली. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे


## शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीच्या विचारधारेचा समाविष्ट करण्यास विरोध केज तालुका जिजाऊ ब्रिगेडचे तहसील कार्यालयाकडे निवेदन

**केज प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या शाळांमध्ये मनुस्मृति आणि रामदास स्वामींच्या दासबोध या ग्रंथातील श्लोकांचा समावेश करण्यात आल्याची बातमी महाराष्ट्रभर पसरली आहे. या निर्णयाला विरोध म्हणून केज तालुका जिजाऊ ब्रिगेडने शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीला विरोध करणारे निवेदन बीड जिल्हा अध्यक्षा राधाताई रामदास सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली केज येथे तहसील कार्यालयातील पेशकार नन्नवरे यांना निवेदन दिले. मनुस्मृति हा हिंदू धर्मातील समस्त बहुजन समाजांचा अपमान करणारा आणि त्यांना हीन लेखनारा ग्रंथ आहे. तसेच मनुस्मृतीने हिंदु धर्मातील समस्त स्त्रियांना जनावरापेक्षाही खालचा दर्जा दिलेला असून स्त्रियांना सर्व प्रकारचे हक्क आणि अधिकार नाकारले आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज यांना सुद्धा मनुस्मृतीचा आधार घेऊनच प्रचंड, विरोध झालेला आहे. सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या शैक्षणिक कार्यालासुद्धा मनुस्मृतीचा आधार घेऊनच प्रतिगाम्यांनी विरोध केलेला होता. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा आशीर्वाद घेऊन रायगडाच्या पायथ्याशी महाडला मनुस्मृतीचे जाहीर दहन केले होते. अशा विषमतावादी ग्रंथातील श्लोक विद्यार्थ्यांना शिकवून त्यांच्या मनात जातीयवाद आणि विषमता सरकारला निर्माण करायची आहे का? असा प्रश्न जिजाऊ ब्रिगेडच्या महिलांनी या निवेदनाद्वारे शासनाकडे विचारला आहे. तसेच रामदास स्वामीचा 'दासबोध' हा ग्रंथसुद्धा विषमता निर्माण करणारा असून त्या ग्रंथामध्ये गुरूची लक्षणे' या अध्यायात बहुजन समाजाला अध्ययन आणि अध्यापन करण्याचा अधिकार नाकारलेला आहे, त्यामुळे जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने या दोन्ही ग्रथांचा अभ्यासक्रमात समावेश करण्याला जाहीर विरोध करण्यात येत आहे. तुकोबांची अभंगगाथा, राष्ट्रसंतांची ग्रामगीता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले साहित्य अभ्यासक्रमात समाविष्ट करावे अशी मागणी निवेदनात केली आहे. सरकारने आमच्या मागणीचा ताबडतोब विचार करुन अभ्यासक्रमातून मनुस्मृती आणि दासबोध ताबडतोब हटवावे. अन्यथा जिजाऊ ब्रिगेडला शिक्षण विभागावर मोर्चा नेऊन संपूर्ण महाराषट्रभर तीव्र आंदोलन उभे करेल, असा ईशाराही बीड जिल्हा जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने देण्यात आला आहे. याप्रसंगी जिजाऊ ब्रिगेडच्या बीड जिल्हाध्यक्ष राधाताई रामदास सपकाळ , अविधा बाळासाहेब शिंदे , आम्रपाली संजय सोनवणे, यांच्यासह इतर माता-भगिनी उपस्थित होत्या.

# पावसाळा लागणार तरी आपेगाव कुरणपिंपरी मार्गावरील पुलाचे काम अर्धवटच

पैठण तालुक्यातील आपेगाव येथील आपेगाव -कुरणपिंपरी माऊलींच्या पालखी मार्गावरील पुलाचे काम मागील सात ते आठ वर्षापासून चालू आहे तरी पूर्ण झाले नाही .सदर कामाच्या अनेक तक्रारी करूनही सदर ठेकेदार हा आपला मनमानी कारभार करून नेहमी कासवाच्या गतीने काम करीत आहे. अवघ्या काही दिवसांवर पावसाळा येऊन ठेपलाय तरीदेखील ठेकेदारांच्या कामात कुठलीही गती दिसत नाहीये. परिणामी पावसाळा सुरू होताच कासवाच्या गतीने सुरू असलेले पुलाचे काम बंद होणार आणि याही वर्षी संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी या मार्गावरून मार्गक्रमण करणार नाही, व परत रस्त्या अभावी माऊली पालखीचे हाल होणार . यावर्षी ठेकेदाराच्या बेजबाबदारपणामुळे वारकरी सांप्रदाय व माऊली भक्तांना दिंडी सोबत लांब चालत जावे लागणार ,तर शेतकऱ्यांचे दरवर्षी हजारो रुपयांचे नुकसान होऊन अनेक गावांची रहदारी दळणवळण विस्कळीत झाली असून शासनाने अनेक कोटींची गुंतवणूक करून असूनही नागरिकांना जर सुख सुविधा पासून वंचित राहावे लागत असेल तर जबाबदार अधिकारी यांनी सदर कामाची दखल घेऊन ठेकेदाराला दंडात्मक कारवाई करून काळे यादी टाकावे .वरिष्ठ अधिकाऱ्यांनी



या गोष्टींची दखल घेणे गरजेचे आहे .सदर ठिकाणी ठेकेदारानी पुलाचे काम करत असताना विनापरवाना गौण खनिज उत्खनन व चोरी करून शासनाला अनेक कोटींचा चुना लावला आहे. शासनाचे खूप मोठे महसुलाचे नुकसान केले . संबंधित ठेकेदाराला कर्तव्यदक्ष तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी सारंग चव्हाण यांनी यापूर्वी दंड प्रक्रियेची नोटीस बजावलीये तरीदेखील शासकीय अधिकारी पुल ठेकेदार एवढे मेहरबान का?का त्यांची पाठराखण केली जात आहे? स्थानिक जबाबदारी अधिकारीही नुसते काम पूर्ण करण्याचे पोकळ आश्वासन देत आहेत व अंग झटकून काम करत आहेत . जर लवकरच कामाची गती संबंधित ठेकेदारानी वाढवली नाही व वेळीच काम पूर्ण केले नाही तर कुरणपिंपरी, आपेगाव, आगर नांदूर,नवगाव ,बोरगाव ,गुंतेगाव ,मुंगी पाथरवाला ,मालेगाव असे शेकडो नागरिकांना व शेतकऱ्यांना सोबत घेऊन अनेक सामाजिक कार्यकर्ते मोठे जन आंदोलन करणार असल्याची माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष गुलदत्त पठाण व सामाजिक कार्यकर्ते व तथा कुरणपिंपरीचे वंचित आघाडीचे तालुकाध्यक्ष कलीम पठाण हे सदर ठेकेदारा विरोधात माननीय न्यायालयात दावा दाखल करणार असून सामान्य जनतेसाठी लढा देणार असून शासनाच्या महसुलाचे झालेल्या नुकसानीचे संबंधित ठेकेदाराला दंडात्मक कारवाई करण्याची माननीय न्यायालयाला विनंती करणार आहे.

## येत्या २४ तासांत मोसमी वारे केरळमध्ये दाखल होणार

गेल्या काही दिवसांपासून मोसमी वाऱ्याचा वेग काहीसा मंदावला होता. आता मान्सूनच्या प्रगतीला पोषक वातावरण तयार होत असून, आता मोसमी वारे हळूहळू आगेकूच करीत आहेत. त्यामुळे येत्या २४ तासांत मोसमी वारे केरळमध्ये दाखल होतील, असे हवामान विभागाने म्हटले आहे.केरळसह दक्षिण अरबी समुद्र, मालदिवचा उर्वरित भाग, लक्षद्वीपचा उर्वरित भाग, ईशान्य आणि आग्नेय बंगालच्या उपसागरात नैऋत्य



मोसमी वारे आगेकूच करतील, असंही हवामान विभागाकडून सांगण्यात येतंय. तसंच येत्या १० जूनपर्यंत मान्सून राज्यात येणार असल्याचंही सांगण्यात येत आहे. अंगाची लाहीलाही करणाऱ्या उन्हानं सर्वचजण त्रासले आहेत. आता प्रत्येकजण चातकाप्रमाणे मान्सूनची वाट पाहत आहे. याबाबत आता हवामान खात्यानं (IMD) चांगली बातमी दिली आहे. येत्या २४ तासांत कधीही मान्सून भारतीय सीमेत प्रवेश करू शकतो, आयएमडीनुसार, पुढील २४ तासांत केरळमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी परिस्थिती अनुकूल राहील.

## कु.शेख तंजीला सदफ नयुम हिचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश



प्रतिनिधी/केज मॉडल इंग्लिश स्कूल केजची विद्यार्थिनी कु.शेख तंजीला सदफ नयुम हिने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करताना ८९.०० % गुण मिळवले आहेत. तिच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. कु.शेख तंजीला सदफ नयुम ही प्रा.नयुम शेख यांची कन्या आहे. तिने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करत ८९.०० % टक्के मिळवले आहेत. तिने अथक परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यास करून हे यश मिळवले आहे. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे.

## जल जीवन मिशन च्या निकृष्ट कामाच्या चौकशीची जिल्हाधिका-याकडे मागणी

**(टाकरवण प्रतिनिधी)**

माजलगाव तालुक्यातील टाकरवनमध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत गावात नळ योजना करता चार कोटी साठ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला मात्र ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून त्याची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी केली आहे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की ,टाकरवन गावामध्ये अनेक वर्षापासून पाण्याची समस्या वाढत चालल्यामुळे अनेक महिलांना दूरवरून पाणी आणावे लागत आहे ही समस्या दूर करण्यासाठी ग्रामस्थांच्या मागणीनुसार टाकरवन सह ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वाढीवस्ती तांडा सह आदी भागातील नागरिकांसाठी केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत साडेचार कोटीचा निधी मंजूर झाला त्यासाठी गोदावरी पात्रालगत एक विहीर खोदण्यात आली आहे त्यानंतर नोव्हेंबर मध्ये या भागातील साठवण टाकी



व पाईपलाईनचे काम करण्यात आले मात्र योजनेचे पूर्ण काम निकष्ट दर्जाचे करण्यात आल्याने जागोजागी पाईपलाईन फुटत आहे अनेक घरांना अद्याप नळ जोडणी देण्यात आलेली नाही साडेचार कोटी रुपये खर्चून हे नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे जून महिना उजडत आला तरी अद्यापही गावात पाणी आले नाही संबंधित गुत्तेदाराने योजनेचे पूर्ण काम बोगस केले असून याची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी उपसरपंच दयानंद गोबरे ,ग्रामपंचायत सदस्य अंगद गायकवाड, पंढरीनाथ भुंबे,दादाराव पटेकर ,परविन इनामदार, स्वाती सातपुते ,शोभा काजळे ,कृष्णाबाई चव्हाण ,जगन्नाथ मानकर, जनार्दन आढागळे ,कविता कानडे आदी सदस्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )